# नियमित दिवाणी दावा क्र.१७४/२०२० मधील निशाणी ३३२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केला असून वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.४ अरविंद विष्णू बाबर हे दिनांक १९.१०.२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॅार्डवर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र.४ चे वारस रकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास जाणुनबजुन विलंब केला आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. वादीने निशाणी ३३२ वरील अर्जाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच वादीने प्रतिवादी क्र.४ चा मृत्युदाखला दाखल केला आहे. प्रस्तुत दावा वादीने निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.४ दिनांक १९.१०.२०२१ रोजी रोजी मयत झाले आहेत. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. तसेच निशाणी ३३२ वरील अर्जाव्यतिरीक्त प्रतिवादी क्र.४ यांना कोणतेही वारस नसल्याचे कथन केले. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

(१) निशाणी ३३२ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्र.वादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेवून योग्य दुरुस्ती या अर्जाचे आदेशापासून १४ दिवसांचे आत करावी व दुरुस्त अर्जाची प्रत हजर करावी.

PALLAVI MANSING SURYAWANSHI

Digitally signed by PALLAVI MANSING SURYAWANSHI
Date: 2025.12.23 16:05:17 +0530

विटा.
दिनांकः- २२.१२.२०२४

(श्रीमती पी.एम.सुर्यवंशी)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा. जि. सांगली.